# पापांचे दुष्परिणाम घालवण्यासाठी प्रायश्चित्ते

## अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे '*' या चिन्हाने दर्शवली आहेत.)


卐 मनोगत ८

१. पाप ९

* समष्टी पाप अन् युद्ध आणि नैसर्गिक आपत्ती ९
* पापाचे महत्त्व ११
* पाप न लागणे १२
* पापाचे दुष्परिणाम कसे घालवावेत ? १६

२. पाप-पुण्य दोघांशी संबंधित सूत्रे (मुद्दे) ४१

* पुण्यासाठी विचार पुरेसा; पण पापासाठी कृती आवश्यक असणे ४१
* पाप-पुण्य लागण्याचे नियम ४३
* संतांचे पाप आणि पुण्य ४५
* पाप-पुण्याचे भागीदार ४५
* 'पाप आणि पुण्य' हे 'देवाणघेवाण संबंधा'पेक्षाही सूक्ष्म असणे ४६
* विविध कर्मे आणि पाप-पुण्य ४७
* पाप-पुण्य आणि आयुष्य ४८
* पाप-पुण्याच्या प्रमाणानुसार मृत्यूनंतरचे स्थान ४९
* पाप-पुण्य आणि आध्यात्मिक उन्नती ५२

३. कर्माची अपरिहार्यता ५२

* सजीव आणि निर्जीव, कोणालाही कर्म सुटलेले नसणे ५५
* विविध योगमार्गांत कर्मे अपरिहार्य असणे ५५

४. कर्माचे परिणाम टाळण्याचे उपाय ५६

५. कर्मे कोठपर्यंत करावीत ? ५८

६. कर्म सुटणे ६१

७. पाप-पुण्याच्या पलीकडे जाण्यासाठी साधना आवश्यक ! ६१

## मनोगत

साधारणपणे असे म्हणता येईल की, धर्मशास्त्राने निषिद्ध किंवा निंद्य ठरवलेले कृत्य करणे, म्हणजे पाप होय ! पाप व्यक्तीला पतित बनवते, त्याची अधोगती करते. यामुळे त्याला रोग, दारिद्र्य आदी भोगावे लागते. पापकर्माची फळे भोगल्यावाचून कोणालाही सुटका नाही. झालेल्या पापांविषयी पश्चात्ताप व्यक्त करून धर्माने सांगितलेली शिक्षा भोगली, तर पापापासून सुटका होऊ शकते. धर्माने सांगितलेली शिक्षा भोगणे, याला 'प्रायश्चित्त' म्हणतात. अन्य पंथांत 'पापाची स्वीकृती (कबुली) देणे, दानधर्म करणे आणि पश्चात्ताप होणे यामुळे पापनिवृत्ती होते', असे सांगितले आहे. हिंदु धर्माने मात्र यापुढे जाऊन विविध पापांची सूची (यादी) करून पापाच्या तीव्रतेनुसार विविध प्रायश्चित्ते, अगदी देहान्त प्रायश्चित्तसुद्धा सांगितले आहे. पापाचे दुष्परिणाम दूर करण्याचे काही धर्मशास्त्रीय मार्ग प्रस्तुत ग्रंथात सांगितले आहेत.

पुण्य-पापात्मक कर्मांमुळे निर्माण होणाऱ्या सुख-दुःखाच्या बंधनापलीकडे जाऊन सतत सच्चिदानंद अवस्थेत रहाता येण्यासाठी असे कर्म करावे लागते की, ज्यामुळे कर्मफल लाभत नाही. कर्माचे परिणाम टाळण्यासाठी काय करावे, याचाही ऊहापोह या ग्रंथात केला आहे.

हा ग्रंथ वाचून वाचकांना पाप-पुण्याकडे पहाण्याची एक नवी दृष्टी लाभावी आणि पाप-पुण्याच्या पलीकडे जाऊन आनंदप्राप्ती करून घेण्यासाठी सदैव साधना करण्याची प्रेरणा मिळावी, ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक**

(सनातनच्या 'कर्मयोग' या मालिकेचे सामाईक मनोगत 'कर्माचे महत्त्व, वैशिष्ट्ये आणि प्रकार' या ग्रंथात दिले आहे.)

**टीप –** ग्रंथातील काही सूत्रांच्या (मुद्यांच्या) शेवटी मराठी किंवा इंग्रजी अक्षरांत संकेतांक वा सांकेतिक चिन्हे कार्यालयीन सोयीसाठी दिली आहेत. त्यांचा लिखाणाशी संबंध नाही. काही अपरिहार्य कारणामुळे काही संकेतांक इंग्रजीत ठेवले आहेत.